आकाशवाणी पुणे
पुणे वृत्तांत
वेळ - संध्याकाळी ०६.०० वा.

दिनांक – २५/०५/२०२४ वार – शनिवार

पुण्यातील लष्करी क्रीडा संस्था आणि महू इथल्या लष्करी क्रीडा संस्थेत मुलींच्या क्रीडा तुकडीचं आणि खेलो इंडिया युथ वसतिगृहाचं उद्घाटन लष्कर प्रमुख जनरल मनोज पांडे यांच्या हस्ते आज पुण्यात करण्यात आले. या वेळी भारतीय क्रीडा प्राधिकरणाचे महासंचालक संदीप प्रधान आणि भारतीय Athletic महासंघाच्या उपाध्यक्ष अंजु बॉबी जॉर्ज यांच्यासह भारतीय क्रीडा क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. जनरल मनोज पांडे यावेळी म्हणाले की, लष्करी क्रीडा संस्थेत उपयुक्त पायाभूत सुविधांसोबत, क्रीडा औषधी, पूरक आहार, खेळाडू पुनर्वसन सुविधा उपलब्ध होतील. क्रीडा प्राधिकरणातर्फे उभारण्यात आलेल्या वसतिगृहाचा उपयोग ऑलिंपिकसाठी तयारी करणाऱ्या खेळाडूंना होईल. १२ ते १६ वर्ष वयोगटातील मुलींना क्रीडा व्यासपीठ प्राप्त व्हावं आणि जागतिक दर्जाचं प्रशिक्षण मिळावं हा हेतू आहे. या तुकडीच्या माध्यमातून ऑलिंपिकसाठी आवश्यक विविध क्रीडा प्रकारांचं प्रशिक्षण दिलं जाणार आहे. यासाठी १ हजार १२४ मुलींमधून ३५ मुलींची निवड करण्यात आली. २४ मुली पुण्यात तर ११ मुली महू इथं प्रशिक्षण घेणार आहेत.

४ जून रोजी होणाऱ्या लोकसभा निवडणूक मतमोजणीसाठी पुणे जिल्ह्यातील पुणे शहर आणि बारामती या दोन मतदार संघांची मतमोजणी पुण्याच्या कोरेगाव पार्क परिसरातील भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामात होत आहे तर मावळ मतदार संघातील मतमोजणी बालेवाडी इथल्या शिवछत्रपती क्रीडा संकुलात आणि शिरुर लोकसभा मतदार संघाची मतमोजणी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या रांजणगाव इथल्या गोदामात होणार आहे. मतमोजणी केंद्रापासून १०० मीटरच्या अंतरात मतमोजणी कर्मचारी, उमेदवारांचे अधिकृत प्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांखेरीज अन्य कोणालाही प्रवेश दिला जाणार नसल्याचं जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी डॉक्टर सुहास दिवसे यांनी स्पष्ट केलं आहे.

इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल सोमवारी म्हणजेच २७ मे या तारखेला दुपारी एक वाजता ऑनलाईन पद्धतीनं जाहीर होणार आहे. मंडळानं निश्चित केलेल्या ६ अधिकृत संकेतस्थळांवरून हा निकाल पाहता येईल, तसंच त्याची छापील प्रतही घेता येईलए, अशी माहिती मंडळानं प्रकाशित केलेल्या पत्रकात दिली आहे.

कल्याणीनगर वाहन अपघात प्रकरणी अल्पवयीन आरोपी मुलाचे आजोबा सुरेंद्र अगरवाल यांना आज पोलिसांनी अटक केली असून चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. मुलासोबत असलेल्या चालकाला धमकावणे आणि डांबून ठेवल्या प्रकरणी गुन्हे शाखेकडून त्यांना अटक करण्यात आली आहे.

पुणे महानगरपालिकेतर्फे मुंढवा, कोरेगावपार्क, एरंडवणा, सदाशिव पेठ या भागांमध्ये हॉटेल, रेस्टॉरंट्सवर  कारवाई करण्यात आली. मुंढवा आणि घोरपडी परिसरातील हॉटेल्सवर  कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले असल्याची माहिती बांधकाम विकास विभागाकडून देण्यात आली. शहरात 14 ठिकाणी 19 हॉटेल्सवर केलेल्या कारवाईत सुमारे सोळा हजार चौरस फुट बांधकामही काढून टाकण्यात आले.

खरीप हंगामात शेतकऱ्यांना दर्जेदार खतं, बियाणं, कीटकनाशकं उपलब्ध व्हावी, यासाठी कृषी विभागाच्या गुणवत्ता नियंत्रण विभागामार्फत जिल्ह्यातील कृषी सेवा केंद्राची १४ भरारी पथकांकडून तपासणी मोहीम सुरू केल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडून देण्यात आली.

पुण्यातील गिरी प्रेमी संस्थेच्या सहकार्याने ममता अंध कल्याण केंद्रातील 22 दृष्टीहिन विद्यार्थ्यांची हिमालय मोहीम नुकतीच पार पडली. या मोहिमेत विद्यार्थ्यांनी मनाली इथं दहा हजार फूट उंचीवरील अटल बोगदा पार करून खोक्सर या ठिकाणी बर्फाचा आनंद लुटला. बियास नदीकाठावरचं गरम पाण्याचं कुंड, माउंट एव्हरेस्ट मूळ शिबिर, तिथली जीवन पद्धती, संस्कृती, राहणीमान, आहार या बाबी विद्यार्थ्यांनी गिरीप्रेमीच्या गिर्यारोहकांकडून संवादाच्या माध्यमातून जाणून घेतल्या.

संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या आषाढीवारी पालखी सोहोळ्याच्या अनुषंगानं पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं वारकऱ्यांसाठी पुरविण्यात येणाऱ्या विविध सेवासुविधांचे आणि इतर नियोजन करण्यासाठी आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. सर्व संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी पालखी सोहोळ्याचं सूक्ष्म नियोजन करावं अशा सूचना त्यांनी दिल्या.

पुढील महिन्यात रशियातील मॉस्को शहरात होत असलेल्या सातव्या ब्रिक्स फेस्टिवलमध्ये पुण्याच्या रूपक नृत्यालयाच्या कथक नृत्य संघाला आमंत्रित करण्यात आलं आहे. ब्रिक्स फेस्टिवलमध्ये सहभागी होण्याचा मान मिळालेला रूपक नृत्यालयाचा देशातील एकमेव संघ आहे, अशी माहिती संस्थापिका मंजिरी कारुळकर यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

पुण्यातील नवले पुलावरील अपघात टाळण्यासाठी ब्ल्यूम फिल्ड ते भूमकर चौकदरम्यान सहा मीटर रुंदीचा सेवा रस्ता विकसित केला जाणार आहे. २२० मीटर लांबीचा हा रस्ता झाला तर नवले पुलावर आणि आसपासच्या परिसरात होणारे अपघात आणि रहदारी कमी होण्याची शक्यता आहे. त्यानुसार या रस्त्याची आखणी करण्याबाबतचा प्रस्ताव पुणे महापालिकेच्या शहर अभियंता कार्यालयाकडून शहर सुधारणा समितीसमोर ठेवण्यात आला आहे.

पुणे शहरातील गॅस सिलिंडरचा काळाबाजार रोखण्यासाठी आम आदमी पार्टीच्या वतीनं जनआंदोलन सुरू करण्यात आलं आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी जातीनं लक्ष घालून गॅस एजन्सीच्या गोदामाची तपासणी करून कारवाई करावी, अशी मागणी शहराध्यक्ष धनंजय बेनकर यांनी  केली.

तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी ०६.०० वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.